सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ८/१०/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थअं-२०२४/प्र.क्र.२४/अर्थसंकल्प-१, दि.७ ऑक्टोबर २०२४

**विषय :-** अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ आणि सुधारित अंदाज २०२४-२५.

******

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अर्थअं-२०२४/प्र.क्र.२४/अर्थसंकल्प-१,दि.७ ऑक्टोबर २०२४ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४१००७१६१६२९८१०५असा आहे.

२. तरी, सदर शासन परिपत्रकानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह).
अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, मुंबई (सस्नेह)
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह).
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / प्रशिक्षण व खास पथके / आस्थापना /प्रशासन नियोजन व समन्वय /विशेष कृती /रा.रा.पो.बल /वाहतूक / फोर्स वन /आर्थिक गुन्हे / दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.



Scanned with CamScanner

अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था/आस्थापना/प्रशासन/सायबर सुरक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, मुंबई/मोटार परिवहन विभाग, पुणे/ महिला व बाल अत्याचार प्रतिबंध विभाग / नागरी हक्क संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्गसह) पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.1 ते 19
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / नि. व स./ धोरण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ उपसहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी, का.क्र.१ ते ४४

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ आणि
सुधारित अंदाज २०२४-२५.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : अर्थअं-२०२४/प्र.क्र.२४/अर्थसंकल्प-१,**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक - ७ ऑक्टोबर, २०२४.

वाचा :- १) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक बीजीटी. १०६३/१७, दिनांक ८ मे, १९६३
२) शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्रमांक एफएनआर. १०६७/१११५३८-७, दिनांक ५ मे, १९७०
३) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक बीजीटी. १०७६/३२५/बीयूडी-५, दिनांक २४ सप्टेंबर, १९७६
४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक बीजीटी. १०७६/५५५/७६/बीयूडी-३, दिनांक ११ नोव्हेंबर, १९७६
५) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक बीजीटी. १०७७/९५/बीयूडी-५, दिनांक १९ मे, १९७७
६) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक पीएफबी. १०८१/सीआर-८/८१/बीयूडी-१७, दिनांक ३ फेब्रुवारी, १९८१
७) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक बीजीटी. २६८१/१६/बीयूडी-२, दिनांक १ मार्च, १९८२
८) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक एसीसी. १०८२/८४९/ बीयूडी-२, दिनांक २६ एप्रिल, १९८३
९) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक एसीसी. १०८२/२६७/बीयूडी-२, दिनांक २० मे, १९८३
१०) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक बीजीटी. १०८३/२७९/बीयूडी-१, दिनांक ३० जून, १९८३
११) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक बीजीटी. २३८४/२२६/बीयूडी-२,दिनांक ३० मे, १९८४
१२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक अंदाज.१०८७/८१/अर्थसंकल्प-१, दिनांक ५ फेब्रुवारी, १९८७
१३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक बीजीटी. १०९३/६७/एक/बीयूडी-२, दिनांक १९ ऑगस्ट, १९९५
१४) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक बीजीटी. १०९३/६७/२/बीयूडी-२, दिनांक २१ ऑगस्ट, १९९५
१५) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक अंदाज. १०९५/सीआर-१४/ अर्थसंकल्प-१, दिनांक ४ नोव्हेंबर, १९९५
१६) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक आकनि. १०९६/प्र. क्र.१०/अर्थसंकल्प-१, दिनांक २६ एप्रिल, १९९६
१७) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक अंदाज.१०९८/प्र.क्र.२३/ अर्थसंकल्प-१, दिनांक १८ जून, १९९८
१८) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक असंक. १०.०१/प्र. क्र. २९/वित्तीय सुधारणा, दिनांक १० सप्टेंबर, २००१
१९) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक बीजीटी.१०.०१/प्र. क्र. १५६२/अर्थसंकल्प-२, दिनांक १ जुलै, २००६
२०) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक बीजीटी. १०.०१/प्र. क्र. १५६२/अर्थसंकल्प-२, दिनांक १६ जानेवारी, २००८
२१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक बीजीटी. २०.१०/प्र. क्र. ६६/अर्थसंकल्प-२, दिनांक १० ऑगस्ट, २०१०
२२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र.८८/अर्थ-१, दिनांक २७ जानेवारी, २०१७
२३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पदनि-०६१७/प्र.क्र.२०/आ.पु.क., दिनांक ९ जून, २०१७

**परिपत्रक**

मंत्रालयाचे प्रशासकीय व नियंत्रण अधिकारी यांनी आपले अर्थसंकल्पविषयक प्रस्ताव वित्त विभागाकडे ज्या तारखांना पाठविणे आवश्यक आहे, त्या तारखा महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमावलीच्या परिशिष्ट- २ मध्ये, इतर गोष्टींबरोबरच विहित केल्या आहेत. अर्थसंकल्पीय अंदाज अंतिमत: निश्चित करून, त्यांचा अर्थसंकल्पात समावेश करण्यापूर्वी वित्त विभागामध्ये त्या संबंधात योग्य ती कार्यवाही करता येणे शक्य व्हावे म्हणून विभाग प्रमुखांनी व मंत्रालयाच्या प्रशासकीय विभागांनी खालील परिच्छेद- ४ मध्ये नमूद केलेल्या तारखांनाच किंवा त्या तारखांपूर्वीच आपले सन २०२५-२०२६ चे अर्थसंकल्पीय अंदाज व नवीन बाबी आणि सन २०२४-२०२५ चे सुधारलेले अंदाज वित्त विभागाकडे निश्चितपणे पाठवावेत.

२. वित्त विभागाचा असा अनुभव आहे की, विहित केलेल्या तारखांप्रमाणे माहिती मिळाली तरीही वित्त विभागाला वेळापत्रकाप्रमाणे काम पूर्ण करण्यासाठी उपलब्ध असणारा वेळ मर्यादित असतो. प्रशासकीय विभागांकडून मिळालेले अर्थसंकल्पीय अंदाज मंत्रिमंडळासमोर ठेवण्यासाठी एकत्रित करण्यापूर्वी त्यांची

वित्त विभागामध्ये छाननी करण्याची आवश्यकता असते आणि विधानमंडळाला सादर करण्यासाठी अशा अंदाजाचे अंतिमरित्या मुद्रण करण्यापूर्वी त्यामध्ये मंत्रिमंडळाने सुचविलेले बदल समाविष्ट करावे लागतात. त्यामुळे कोणत्याही आवश्यक बाबी उशिरा मिळाल्या तर संपूर्ण वेळापत्रकच विस्कळीत होते.

३. **अर्थसंकल्पीय नमुने** - शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक बीजीटी. १०७६/५५५/७६/बीयूडी-३, दिनांक ११ नोव्हेंबर, १९७६ याकडे सर्व प्रशासकीय विभागांचे लक्ष वेधण्यात येत आहे. या शासन निर्णयानुसार अर्थसंकल्पीय नमुन्यांचे प्रमाणीकरण करण्यात आले असून असे नमुने येरवडा,पुणे व नागपूर येथील शासकीय मुद्रणालयांकडून मागविण्याबाबत नियंत्रण अधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे. त्यामुळे, ठराविक तारखांना विहित नमुन्यात आपले अर्थसंकल्पीय अंदाज पाठविण्यास विभागांना कोणतीही अडचण राहणार नाही.

३.१ या परिपत्रकाच्या परिच्छेद- ४ मध्ये दर्शविलेली माहिती पाठविण्यासाठी विहित विवरणपत्राच्या नमुन्यात कोणतेही बदल करण्यात आलेले नसले तरी शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र.८८/अर्थ-१, दिनांक २७ जानेवारी, २०१७ अन्वये सन २०१७-२०१८ पासून योजनांतर्गत व योजनेतर खर्चाचे एकत्रिकरण झाले असून आता त्याची अनुक्रमे कार्यक्रम व अनिवार्य खर्च अशी विभागणी झाली आहे, ही बाब लक्षात घेता त्याप्रमाणे सन २०२५-२०२६ चे अर्थसंकल्पीय अंदाज व सन २०२४-२०२५ चे सुधारित अंदाज सादर करावेत.

४. **अर्थसंकल्पविषयक माहिती सादर करण्याच्या तारखा.**-अर्थसंकल्पीय अंदाजांबाबत वित्त विभागात आणि नियोजन विभागात योग्य ती कार्यवाही करता येणे शक्य व्हावे, तसेच ते वेळेवर अंतिमत: निश्चित करून त्यांचा सन २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पात समावेश करता येणे शक्य व्हावे म्हणून खाली नमूद केलेल्या तारखांनाच अथवा त्यापूर्वी आपले **अंदाज, नवीन बाबी व इतर माहिती पाठविण्यात यावी.** अर्थसंकल्प विधानमंडळास सादर झाल्यानंतर त्याच दिवशी अथवा दुसऱ्या दिवशी कार्यक्रम अंदाजपत्रक हे प्रकाशनसुद्धा विधानमंडळास सादर करणे अनिवार्य असल्यामुळे विभागाने विहित वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करण्याची अधिकच गरज आहे :-

| | बाब | अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १) | **(एक)** नियंत्रण अधिकाऱ्यांनी संबंधित प्रशासकीय विभागांना विहित नमुन्यात सादर करावयाचे महसुली/भांडवली जमा रकमा व कायमस्वरूपाच्या अनिवार्य खर्चासंबंधीचे **सन २०२५-२०२६ चे अर्थसंकल्पीय अंदाज.** | १६ ऑक्टोबर, २०२४ |
| | **(दोन)** नियंत्रण अधिकाऱ्यांनी संबंधित प्रशासकीय विभागांना सादर करावयाचे कायमस्वरूपाच्या कार्यक्रम खर्चाचे आणि राज्य/केंद्र योजनेखालील चालू कार्यक्रमांतर्गत खर्चासंबधीचे **सन २०२५-२०२६ चे अर्थसंकल्पीय अंदाज.** | १६ ऑक्टोबर, २०२४ |
| | **(तीन)** वरील **(एक)** आणि **(दोन)** यांच्या बाबतीत प्रशासकीय विभागांनी वित्त विभाग तसेच नियोजन विभागास (फक्त कार्यक्रमांतर्गत) **सादर करावयाचे सन २०२५-२०२६ चे अर्थसंकल्पीय अंदाज.** | ३१ ऑक्टोबर, २०२४ |
| २) | **(एक)** नियंत्रण अधिकाऱ्यांनी प्रशासकीय विभागांना सादर करावयाच्या पहिल्या ४ महिन्यांच्या प्रत्यक्ष रकमांवर आधारलेले सन २०२४-२०२५ चे सुधारलेले अंदाज (जमा व खर्च). | १६ ऑक्टोबर, २०२४ |
| | **(दोन)** प्रशासकीय विभागांनी वित्त विभागाला सादर करावयाच्या पहिल्या ४ महिन्यांच्या प्रत्यक्ष रक्कमांवर आधारलेले सन २०२४-२०२५ चे एकत्रित चारमाही सुधारलेले अंदाज. (जमा व खर्च) | ३१ ऑक्टोबर, २०२४ |

| | | |
|---|---|---|
| ३) | प्रशासकीय विभागांनी विहित नमुन्यामधील प्रमाणभूत उद्दिष्टांनुसार तपशीलवार विभागणी आणि जिल्हावार तपशील यांसह वित्त विभागाला सादर करावयाच्या **अनिवार्य खर्चाचे**--भाग एक आणि भाग दोन-**नवीन बाबी** | ४ डिसेंबर, २०२४ |
| ४) | **(एक)** नियंत्रण अधिकाऱ्यांनी प्रशासकीय विभागांना सादर करावयाच्या पहिल्या ८ महिन्यांच्या प्रत्यक्ष रकमांवर आधारित सन २०२४-२०२५ चे एकत्रित सुधारलेले अंदाज (जमा व खर्च). | २७ डिसेंबर, २०२४ |
| | **(दोन)** प्रशासकीय विभागांनी वित्त विभागाकडे सादर करावयाच्या पहिल्या ८ महिन्यांच्या प्रत्यक्ष रकमांवर आधारित सन २०२४-२०२५ चे एकत्रित सुधारलेले अंदाज (जमा व खर्च). | ३ जानेवारी, २०२५ |
| ५) | प्रशासकीय विभागांनी विहित नमुन्यातील प्रमाणभूत उद्दिष्टांनुसार तपशीलवार विभागणी आणि जिल्हावार तपशील यांसह नियोजन विभागाला नमुना “इ”, “एफ”, आणि “जी” मध्ये सादर करावयाच्या **कार्यक्रमांतर्गत खर्चाचे** भाग एक आणि भाग दोन- **नवीन बाबी** | जानेवारी २०२५ चा दुसरा आठवडा |
| ६) | **(एक)** वित्त विभागाला पाठवावयाच्या प्रतीसह नियंत्रण अधिकाऱ्यांनी प्रशासकीय विभागांना सादर करावयाचे पहिल्या ९ महिन्यांच्या प्रत्यक्ष रकमांवर आधारित सन २०२४-२०२५ चे सुधारलेले अंदाज (जमा व खर्च). | १७ जानेवारी, २०२५ |
| | **(दोन)** प्रशासकीय विभागांनी वित्त विभागाला सादर करावयाचे पहिल्या ९ महिन्यांच्या प्रत्यक्ष रकमांवर आधारित सन २०२४-२०२५ चे एकत्रित सुधारलेले अंदाज (जमा व खर्च). | २९ जानेवारी, २०२५ |
| ७) | प्रशासकीय विभागांनी वित्त विभागाला सादर करावयाची, स्वीकृत सुधारलेले अंदाज आणि स्वीकृत नवीन बाबींचा खर्च यांचा समावेश असलेली, वरील **(३)** आणि **(५)** ह्या परिच्छेदांच्या संबंधातील एकत्रित विवरणपत्रे | २९ जानेवारी, २०२५ |

**टीप-१.---** उपरोक्त विवरणपत्रात नमूद केलेल्या नियोजन विभागास पाठवावयाच्या बाबी, विहित दिनांकाच्या १५ दिवस अगोदर नियोजन विभागास पाठविण्याची दक्षता घेण्यात यावी. या संदर्भात सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांचे लक्ष या विभागाचे परिपत्रक क्रमांक अंदाज.१०९८/प्र.क्र.२३/ अर्थसंकल्प-१, दिनांक १८ जून, १९९८ कडे वेधण्यात येत आहे. सदर परिपत्रकात परिच्छेद-४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विहित तारखेची वाट न पाहता लवकरात लवकर अंदाज वित्त विभागाकडे पाठवावेत.

**टीप-२.---** स्थानिक क्षेत्राशी संबंधित असलेले खर्चाचे अंदाज वर लाल शाईने लिहिण्यात यावेत आणि ते वरील विवरणपत्रातील १)(एक), १)(दोन), १)( तीन), २)(एक), ४)(एक), ५), ७) यासमोर नमूद केलेल्या दिनांकाला वित्त विभागाबरोबरच ग्रामविकास विभागाकडेही पाठविण्यात यावेत.

**<u>महत्त्वाचे:</u>**

**टीप-३.---** १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील पंचायत राज संस्था व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांना त्यांच्या बळकटीकरणासाठी अनुदान देण्यात येते. सदर अनुदान प्राप्त करण्यासाठी राज्याच्या मूळ अर्थसंकल्पीय दस्तऐवजासोबत पंचायत राज संस्था (जिल्हा परिषद/पंचायत समिती/ग्रामपंचायत) व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था (महानगरपालिका/नगर पालिका/मंडळे) यांना अनुक्रमे १९६, १९७ व १९८ तसेच १९१, १९२ व १९३ या गौणशीर्षाखाली वितरित करावयाच्या अनिवार्य व कार्यक्रमावरील खर्चाच्या निधीची स्वतंत्र पुरवणी जोडणे बंधनकारक केलेले आहे. या अनुषंगाने अशी पुरवणी

ग्राम विकास विभाग व नगर विकास विभागामार्फत अर्थसंकल्पीय प्रकाशनासोबत विधान मंडळाला सादर करणे अपेक्षित आहे. त्यानुषंगाने **या परिपत्रकाद्वारे सर्व प्रशासकीय विभागांना सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या विभागामार्फत** नागरी स्थानिक स्वराज्य संस्था (महानगरपालिका/ नगरपालिका / मंडळे) **आणि पंचायत राज संस्था (जिल्हा परिषद/पंचायत समिती/ग्रामपंचायत) यांना मुख्य लेखाशीर्ष ते उद्दिष्टे संकेतांकापर्यंत जिल्हानिहाय गौण शीर्षांतर्गत** (१९६, १९७ व १९८ तसेच १९१, १९२ व १९३) **वितरित करावयाच्या अनिवार्य व कार्यक्रमावरील खर्चाच्या निधीची तसेच केंद्र पुरस्कृत राज्य अर्थसंकल्पाबाहेरील निधीच्या तरतुदीचा तपशील दर्शविणारी माहिती (पुरवणी स्वरूपात) विहित कालमर्यादेत ग्राम विकास विभाग व नगर विकास विभागाला** न चुकता द्यावी अन्यथा त्यांचे अर्थसंकल्पीय अंदाज वित्त विभागाच्या प्रकाशनात अंतर्भूत केले जाणार नाहीत. यासाठी संबंधित विभाग जबाबदार राहील.

## ५. अचूक अर्थसंकल्पीय अंदाज व सुधारित अंदाज तयार करणे

५.१ वार्षिक कार्यक्रमाचे स्वरूप आणि अशा कार्यक्रमाकरिता जादा साधनसंपत्ती उभारण्याची आवश्यकता ही संपूर्णत: आगामी वर्षाच्या उत्पन्नाच्या अंदाजावरच आधारलेली असल्यामुळे जमा तसेच खर्च, विशेषत: अनिवार्य खर्च, ह्यांचे अर्थसंकल्पीय अंदाज बिनचूक आणि वास्तववादी आधारावर तयार करणे अत्यंत आवश्यक आहे. नियंत्रण अधिकाऱ्यांकडून किंवा प्रशासकीय विभागांकडून त्यांचे अर्थसंकल्पीय अंदाज वित्त विभागाला मिळण्यास फारच विलंब होतो आणि काही बाबतीत ते अजिबात येत नाहीत, असे आढळून आले आहे. ह्यामुळे अर्थसंकल्पीय वेळापत्रकच विस्कळीत होते असे नव्हे तर अर्थसंकल्पीय अंदाज अपुऱ्या माहितीवर तयार करावे लागतात. अशा अपुऱ्या माहितीवर आणि आकड्यांवर आधारित अंदाज केवळ तर्कच ठरतात. म्हणून नियंत्रण अधिकाऱ्यांनी त्यांच्याशी संबंधित असलेले अंदाज फार काळजीपूर्वक अभ्यासाने तयार करून वेळेवर व विहित केलेल्या वेळापत्रकाप्रमाणेच पाठवावेत. विधानमंडळाच्या लोकलेखा समिती, अंदाज समिती यांनी देखील विभागाने वास्तववादी अंदाज तयार केले पाहिजेत अशा वारंवार सूचना केलेल्या असतानासुद्धा असे आढळून आले आहे की, अंदाजासंबंधी योग्य स्पष्टीकरण, अंदाजाचा कल व इतर महत्त्वाचा तपशील दिला जात नाही. अंदाज समितीस दिलेली आश्वासने प्रत्यक्ष कृतीत आणण्याच्या दृष्टीने अंदाज काळजीपूर्वक करावेत. जेणेकरून लोकलेखा समितीने केलेल्या काटेकोर तपासणीत असे अंदाज वास्तव ठरतील व प्रत्यक्ष रकमेशी ते मिळते-जुळते राहतील. म्हणून महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमावलीमधील तरतुदी आणि अर्थसंकल्पीय अंदाज तयार करण्याचा अनुभव या आधारे अर्थसंकल्पीय अंदाज तयार करण्याची आवश्यकता सर्व प्रशासकीय विभागांनी आपल्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व प्राक्कलन अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

५.२ विधानमंडळाच्या अंदाज समितीने तसेच लोकलेखा समितीने यापूर्वीच अंदाज व प्रत्यक्ष रकमा यामधील तफावत शासनाच्या निदर्शनास आणून दिलेली आहे आणि असा अभिप्राय व्यक्त केला आहे की, जमा रकमा व खर्चाच्या रकमा यांचे अंदाज अतिशय काळजीपूर्वक तयार करण्यात आल्यास अशी तफावत टाळता येईल. म्हणून प्रशासकीय विभागांच्या असे निदर्शनास आणून देण्यात येत आहे की, त्यांनी चालू वर्षासाठीचे सुधारित अंदाज त्याचप्रमाणे पुढील वर्षासाठीचे अर्थसंकल्पीय अंदाज तयार करताना, अतिशय काटेकोरपणे काळजी घेण्याबद्दल, विभाग प्रमुखांना कळवून, त्यांची आवश्यकता त्यांना पटवून द्यावी.

५.३ शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक अंदाज १०९५/सीआर-१४/ अर्थसंकल्प-१, दिनांक ४ नोव्हेंबर, १९९५ अन्वये "वेतन" या उद्दिष्टाखाली मंजूर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय व वर्षअखेरीस मंजूर करण्यात आलेल्या अंतिम सुधारित अनुदानाचे पुनर्विनियोजन इतर कोणत्याही उद्दिष्टाकडे करता येणार नाही. त्यामुळे याबाबतचे अचूक अंदाज तयार करणे अत्यावश्यक झाले आहे. वेतन या उद्दिष्टाचे अचूक

अंदाज सादर करताना त्यासोबत विभागाने आकृतिबंधाने निश्चित केलेली पदे, भरलेली व रिक्त पदांचा गोषवारा व पदनिर्मितीचे शासन निर्णय सादर करावेत.

तसेच बाहययंत्रणेद्वारे करुन घेण्यात येणाऱ्या सेवांची देयके १०-कंत्राटी सेवा या उद्दीष्ट शीर्षातून प्रदान करणेबाबतच्या सूचना वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक संकिर्ण-२०१९/प्र.क्र.२२/कोषा- प्रशा-४, दिनांक १७ जुलै, २०२० नुसार देण्यात आल्या आहेत. त्यानुसार बाहययंत्रणेद्वारे घेण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या सेवांची देयकेसुध्दा "१०- कंत्राटी सेवा" या उद्दिष्ट शीर्षातून भागविण्यात यावीत. आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात बाहययंत्रणेद्वारे घेतलेल्या सेवांच्या प्रदानाकरिता निधीची आवश्यक तरतूद "१०- कंत्राटी सेवा" या बाबी खाली अर्थसंकल्पीत करण्याची सर्व विभागांनी दक्षता घ्यावी.

५.४ चालू वर्षाचे सुधारित अंदाज तयार करताना ते जमा व खर्चाच्या प्रगतीच्या योग्य व नियंत्रित माहितीवर आधारित आहेत ह्याची प्रशासकीय विभागांनी खात्री करून घ्यावी. तसेच जमा व खर्च ह्यांच्या मूळ अंदाजातील तफावतीसंबंधीचे तपशीलवार समर्थन सुधारित अंदाज पाठविताना द्यावे. लोकलेखा समितीच्या १९८३-८४ च्या पंधराव्या अहवालातील शिफारशींवर कार्यवाही ह्या विषयावरील शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक बीजीटी. २३८४/२२६/बीयूडी-२,दिनांक ३० मे, १९८४ कडे सर्व मंत्रालयीन विभागांचे तसेच त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेल्या सर्व विभाग प्रमुखांचे लक्ष वेधण्यात येत आहे व त्यांनी त्यामधील सूचना काटेकोरपणे अंमलात आणाव्यात अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे.

५.५ प्रशासकीय विभाग, नियंत्रण अधिकारी आणि आहरण व संवितरण अधिकारी ह्यांना अशी विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक बीजीटी. २६८१/१६/बीयूडी-२, दिनांक १ मार्च, १९८२ मधील सूचना सुधारित अंदाज पाठविताना लक्षात घ्याव्यात. तसेच नियंत्रण अधिकारी यांनी पहिल्या ४, ८ व ९ महिन्यांच्या प्रत्यक्ष खर्चावर आधारित असलेले अर्थसंकल्पात समाविष्ट असलेल्या बाबींचे सुधारित अंदाज विहित नमुन्यात सुधारित अंदाजाला जोडपत्र म्हणून पाठवीत आहेत, ह्याची खात्री करावी.

५.६ मंजूर अनुदानापेक्षा जादा खर्च होणे ही एक अर्थसंकल्पीय अनियमितता असून खर्चावर योग्य व परिणामकारक नियंत्रण नसल्याचे ते द्योतक आहे. ह्या बाबतीत लोकलेखा समितीने १९९५-९६ च्या पाचव्या अहवालात अत्यंत प्रतिकूल अभिप्राय व्यक्त केलेले आहेत. नियंत्रण अधिकारी व प्रशासकीय विभाग ह्यांनी सुधारित अंदाज तयार करताना जास्तीत जास्त काळजी घ्यावी व मंजूर अगर सुधारित अंदाजापेक्षा जास्त खर्च होणार नाही हे पाहणे, ही त्यांची संयुक्त जबाबदारी आहे. मंजूर अनुदानापेक्षा जादा खर्च होण्याची शक्यता निर्माण झाल्यास व तो खर्च अपरिहार्य असल्यास त्या खर्चासाठी वित्त विभागाची पूर्वपरवानगी घेण्यात आली पाहिजे. याबाबत प्रशासकीय विभागांनी सर्व नियंत्रण अधिकाऱ्यांना योग्य ती दक्षता घेण्याच्या सूचना द्याव्यात. तसेच मंजूर किंवा सुधारित अनुदानात खर्च न भागविल्यास नियंत्रण अधिकाऱ्यास व्यक्तिशः जबाबदार धरण्यात येऊन त्याची गांभिर्याने दखल त्यांच्या गोपनीय अहवालात घेण्यात येईल तसेच शिस्तभंगाची कडक कारवाई होऊ शकेल व वेतनवाढ रोखणे अगर अनियमिततेच्या प्रकारानुसार पदावनती ह्यासारख्या शिस्तभंगाच्या कार्यवाहीस संबंधित अधिकारी पात्र होतील असेही त्यांस स्पष्ट करावे.

५.७ न्यायालयाच्या निवाड्यानुसार खर्च करण्यासाठी संबंधित लेखाशीर्षाखाली पुरेशी "भारित" तरतूद उपलब्ध नसल्यामुळे आकस्मिकता निधीतून अग्रिमासाठीच्या प्रकरणांची संख्या व अग्रिमांच्या भरपाईसाठी सादर कराव्या लागणाऱ्या पुरवणी मागण्यांची संख्या फार वाढली आहे. तरी अशी परिस्थिती उद्भवू नये म्हणून सर्व विभागांनी त्यांच्या प्रधान शीर्षाखाली मागील पाच वर्षांतील अशा प्रकारचा "भारित खर्च" लक्षात घेऊन त्यानुसार सन २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पात पुरेशी "भारित" तरतूद प्रस्तावित करावी. याबाबत या विभागाच्या परिपत्रक क्रमांक अंदाज.१०८७/८१/अर्थसंकल्प-१, दिनांक ५ फेब्रुवारी, १९८७ प्रमाणे सूचना

दिलेल्या आहेत. अपवादात्मक परिस्थितीशिवाय सदर कारणास्तव वर्षभरात जर पुरवणी मागण्या सादर कराव्या लागल्या तर त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर राहील.

## ६. नवीन बाबी

६.१ अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यासाठी “नवीन” खर्चाचे प्रस्ताव तयार करताना प्रशासकीय विभागांनी शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक बीजीटी. १०९३/६७/एक/बीयूडी-२, दिनांक १९ ऑगस्ट, १९९५ अन्वये खर्चाच्या नवीन बाबी आणि नवीन प्रमुख बांधकामे यांचे बाबतीत खालील वित्तीय मर्यादा लक्षात घ्यावी:---

| | | |
|---|---|---|
| किमान वार्षिक आवर्ती खर्च | .. | २, ००,०००/- (रू. दोन लक्ष) |
| किमान वार्षिक अनावर्ती खर्च | .. | २०, ००,०००/- (रू. वीस लक्ष) |
| आवर्ती व अनावर्ती दोन्ही प्रकारचे खर्च अंतर्भूत असलेली प्रकरणे | | २०,००,०००/- (रू. वीस लक्ष) |

६.२ तसेच त्यांचे लक्ष शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक बीजीटी. १०९३/६७/२/बीयूडी-२, दिनांक २१ ऑगस्ट, १९९५ कडेही वेधण्यात येत आहे. त्या अन्वये लोकलेखा समितीच्या स्वीकारलेल्या शिफारशींनुसार सर्व नवीन बांधकामे स्वतंत्र परिशिष्टामध्ये संबंधित प्रशासकीय विभागांच्या भाग दोन-खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज यामध्ये सन १९९६-१९९७ च्या अर्थसंकल्पीय अंदाजापासून दाखविण्याचे ठरविण्यात आले आहे. तरी संबंधित प्रशासकीय विभागांनी त्यानुसार सन २०२५-२०२६ या वर्षाची माहिती पाठविण्याची काळजी घ्यावी.

६.३ तसेच शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक बीजीटी. १०७७/९५/बीयूडी-५, दिनांक १९ मे, १९७७ कडे प्रशासकीय विभागांचे लक्ष वेधण्यात येत आहे. त्या परिपत्रकामध्ये वर्षाच्या कालावधीमधील पूरक मागण्यांच्या संख्येवर मर्यादा घालण्याच्या बाबतीतील आवश्यकतेवर भर दिलेला आहे. तसेच शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक आकनि. १०९६/प्र. क्र. १०/अर्थसंकल्प-१, दिनांक २६ एप्रिल, १९९६ अन्वये आकस्मिकता निधी अग्रिम प्रकरणांची संख्या मर्यादित ठेवण्याबाबत काळजी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्व “नवीन” खर्चासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. यासाठी शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक बीजीटी. १०६३/१७, दिनांक ८ मे, १९६३ यामध्ये योजल्याप्रमाणे, नियोजन विभाग आणि/किंवा वित्त विभाग यांचेकडून नवीन बाबीची योग्य ती छाननी करून घेण्यासाठी व त्यांच्याकडून त्या संमत करून घेण्यासाठी आगाऊ कार्यवाही करणे हा एकमेव मार्ग आहे. त्याप्रमाणे प्रशासकीय विभागांनी पुढील वर्षाकरिता अर्थसंकल्पात समाविष्ट करावयाच्या आपल्या सर्व नवीन बाबींची नियोजन विभागाने आणि/किंवा वित्त विभागाने आगाऊ म्हणजेच, **दिनांक ४ डिसेंबर, २०२४ पूर्वी** योग्य प्रकारे छाननी केलेली आहे व सदर नवीन बाबीस व्यय अग्रक्रम समितीने मान्यता दिलेली आहे याची खात्री करून घ्यावी. तसेच धोरण किंवा विद्यमान धोरणातील बदल यांचा अंतर्भाव असलेल्या प्रस्तावावर आधारलेल्या बाबी अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट करण्यासाठी वित्त विभागाला/नियोजन विभागाला पाठविण्यापूर्वी, अशा नवीन बाबींच्या प्रस्तावांना मंत्रिमंडळाने योग्य प्रकारे मान्यता दिली आहे, हे देखील प्रशासकीय विभागांनी पहावे. प्रशासकीय विभागांनी नवीन बाबी आपल्या विभागाच्या संबंधित मंत्र्यांना दाखवून त्यांची मान्यता घेऊन त्याप्रमाणे अग्रक्रम द्यावा.

६.४ शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक असंक. १०.०१/प्र. क्र. २९/वित्तीय सुधारणा, दिनांक १० सप्टेंबर, २००१ तसेच शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पदनि-०६१७/प्र.क्र.२०/आ.पु.क., दिनांक ९ जून, २०१७ अन्वये नवीन पदे निर्माण करण्याच्या प्रस्तावास वित्त विभागाची व कार्यक्रमांतर्गत खर्चाच्या योजनांच्या बाबतीत नियोजन व वित्त विभागाची मान्यता प्राप्त झाल्यावर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली

स्थापन केलेल्या समितीकडे सखोल तपासणी करण्यासाठी पाठवून समितीच्या मान्यतेनंतर केवळ रुपये ७,६०० व त्यापेक्षा अधिक ग्रेड वेतन असलेल्या (असुधारित- सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे) नवीन पदनिर्मितीचे प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या पूर्वसंमतीसाठी मंत्रिमंडळापुढे ठेवण्यात यावेत व अशाप्रकारे मंत्रिमंडळाची मान्यता असल्याशिवाय कोणतेही पद निर्माण करण्याचे आदेश काढू नयेत. नवीन पदे निर्माण करण्यासंबंधीच्या नवीन बाबी पाठविताना रुपये ७,६०० व त्यापेक्षा अधिक ग्रेड वेतन असलेल्या (असुधारित- सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे) नवीन पदनिर्मितीच्या प्रस्तावास मंत्रिमंडळाची मान्यता घेतली आहे, असे स्पष्ट प्रमाणपत्र देण्यात यावे. त्याचप्रमाणे, विभागाने आगामी वर्षाचे अंदाज/नवीन बाबी यांच्याशी संबंधित असलेले आपले सर्व प्रस्ताव सर्व बाबतीत परिपूर्ण असून त्याच्या पुष्ट्यर्थ आवश्यक ती माहिती देण्यात आलेली आहे, याची खात्री करून घ्यावी.

६.५ नवीन योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व प्राथमिक गोष्टी आगामी वर्षापूर्वी पूर्ण करण्यात आल्या आहेत, याबद्दल प्रशासकीय विभागांनी खात्री करून घ्यावी. त्यामुळे या योजनांच्या संबंधात केलेल्या तरतुदी कमी पडणार नाहीत किंवा त्या परत कराव्या लागणार नाहीत याची काळजी घ्यावी. भाग एक-नवीन बाब यांच्या बाबतीत अंतिम वार्षिक आवर्ती खर्च तयार करताना पदांचा सरासरी खर्च तयार करण्याच्या बाबतीत शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्रमांक एफएनआर. १०६७/१११५३८-७, दिनांक ५ मे, १९७० यामध्ये समाविष्ट असलेल्या सूचनांचे पालन करावे. तसेच अंतिम वार्षिक आवर्ती खर्चामध्ये आवर्ती स्वरूपाच्या इतर बाबींवरील खर्च आणि कर्मचारी वर्गाचे वेतन व भत्ते यांचाही समावेश करावा.

## ७. उद्दिष्टनिहाय वर्गीकरण

७.१. जमेच्या रकमा/खर्चाच्या रकमा या सर्वसाधारणत: इतर तपशीलवार शीर्षाशी किंवा उद्दिष्टांशी मिळत्याजुळत्या नसतील किंवा त्या रकमांचे त्या विशिष्ट तपशीलवार शीर्षाखाली किंवा उद्दिष्टांकरिता सहजासहजी वर्गीकरण करता येत नसेल तेंव्हा, अशा क्वचित प्रसंगीच केवळ खर्चविषयक अंदाजातील “इतर खर्च” व जमाविषयक अंदाजातील “इतर जमा” या तपशीलवार शीर्षाचा वापर करण्यात आला आहे, याबद्दल प्रशासकीय विभागांनी आपली खात्री करून त्यांनी सर्वसाधारणपणे या बाबीखाली नोंद घेतलेल्या जमा रकमांचा/खर्चाचा आढावा घ्यावा व आवश्यक असेल तर वित्त विभाग व महालेखापाल यांच्याशी विचारविनिमय करून त्यांचे पुन्हा वर्गीकरण करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी.

७.२. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक बीजीटी. २०.१०/प्र. क्र. ६६/अर्थसंकल्प-२, दिनांक १० ऑगस्ट, २०१० नुसार केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनानेही दिनांक १६ जानेवारी, २००८ च्या शासन निर्णयात बदल करून सन २०११-१२ पासून उद्दिष्ट शीर्ष क्र. ३५ हे भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता अनुदान आणि उद्दिष्ट शीर्ष क्र. ३६ हे सहायक अनुदाने (वेतन) यासाठी वापरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विद्यमान उद्दिष्टे व त्यांचा संकेतांक, सुधारित उद्दिष्टे व त्यांचे संकेतांक आणि या सुधारित उद्दिष्टांमध्ये खर्चाच्या ज्या विवक्षित कार्याचा अंतर्भाव अपेक्षित आहे, त्याचे तपशीलवार विवरणपत्र उपरोल्लेखित दिनांक १० ऑगस्ट, २०१० च्या शासन निर्णयासोबत जोडलेले आहे. तरी सदर शासन निर्णयाच्या विवरणपत्राचा सखोल अभ्यास करून या सुधारित उद्दिष्टांप्रमाणे सन २०२५-२०२६ चे अर्थसंकल्पीय अंदाज पाठवावेत. सुलभ संदर्भाकरिता या परिपत्रकासोबत प्रमाण उद्दिष्टशीर्षांची सूची **जोडपत्र-१** येथे नमूद केली आहे. परंतु अनुभव असा आहे की, बऱ्याच विभागांनी तरतूद प्रस्तावित करताना उद्दिष्टनिहाय वर्गीकरणाचा वापर केलेला नसतो. सन २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पाच्या बाबतीत तरतूद प्रस्तावित करताना त्या काटेकोरपणे उद्दिष्टनिहाय असतीलच याची विभागांनी खात्री करून घ्यावी.

७.३. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक बीजीटी. १०८३/२७९/बीयूडी-१, दिनांक ३० जून, १९८३ च्या परिच्छेद- २ मधील सूचनेप्रमाणे "वेतन" ह्या उद्दिष्टाखालील अर्थसंकल्पीय अंदाज/सुधारित अंदाज पाठविताना त्याची विभागणी (अ)वेतन, (ब)महागाई भत्ता, (क)घरभाडे भत्ता, (ड)शहर पूरक भत्ता, (इ)इतर भत्ते अशी स्वतंत्ररित्या व न चुकता देण्यात यावी. त्याचप्रमाणे शैक्षणिक संस्था, स्थानिक संस्था, कृषी विद्यापीठे इत्यादींच्या संबंधातील "सहायक अनुदान/अंशदान/अर्थसहाय्य" ह्यामधील "वेतन" या उद्दिष्टाखालील अर्थसंकल्पीय अंदाज/सुधारित अंदाज यामधील तरतुदींचीही तशीच विभागणी देण्यात यावी.

७.४. संगणकाच्या (कॉम्प्युटर) सहाय्याने हिशेब करण्याच्या दृष्टीने जमेच्या/खर्चाच्या प्रत्येक बाबीला संकेतांक (डिजिटल कोड नंबर्स) देण्यात आलेले आहेत. नियंत्रण अधिकाऱ्यांना व प्रशासकीय विभागांना असे कळविण्यात येत आहे की, त्यांनी सर्व जमेच्या/खर्चाच्या अंदाजासमोर संबंधित संकेतांक (कोड नंबर्स) न चुकता दर्शवावेत.

७.५ प्रत्येक आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पीय प्रकाशनांची महालेखाकार कार्यालयाकडून छाननी करण्यात येऊन अर्थसंकल्पातील त्यांच्या निदर्शनास आलेल्या त्रूटी महालेखाकार कार्यालयाकडून पत्राद्वारे वित्त विभागास कळविण्यात येतात. महालेखाकार कार्यालयाच्या सदर पत्रांच्या प्रती आवश्यक कार्यवाहीसाठी संबंधीत विभागांना पाठविण्यात येतात. महालेखाकार कार्यालयाने सन २०२१-२२, सन २०२२-२३, सन २०२३-२४ व २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय प्रकाशनातील खर्चाची छाननी केली असून अर्थसंकल्पातील त्यांच्या निदर्शनास आलेल्या त्रूटीबाबत अनुक्रमे त्यांच्या क्र. टीएम/सीएच-१/बजेट स्क्रुटीनी/२०२१-२२/७६, दिनांक १८ मे, २०२१, क्र. टीएम/सीएच-१/बजेट स्क्रुटीनी/२०२२-२३/१७६, दिनांक १५ जून, २०२२, क्र. टीएम/सीएच-१/बजेट स्क्रुटीनी/२०२३-२४/१७२, दिनांक १९ मे, २०२३ व क्र. टीएम/सीएच-१/बजेट स्क्रुटीनी/२०२४-२५/२००, दिनांक १५ मे, २०२४ च्या पत्रान्वये वित्त विभागास कळविले आहे. सदर पत्रांच्या प्रती देखील आवश्यक कार्यवाहीसाठी संबंधित विभागांना यापूर्वीच अर्थसंकल्प कार्यासनांकडून उपलब्ध करुन दिल्या आहेत. सदरहू पत्रान्वये महालेखाकार कार्यालयाने निदर्शनास आणलेल्या त्रुटींची पूर्तता तातडीने करण्यात यावी.

महालेखाकार कार्यालयाने निदर्शनास आणलेल्या महत्वपूर्ण बाबी पुढीलप्रमाणे आहेत :-

(अ) "८०० इतर जमा/ खर्च" या गौणशीर्षाचा सतत वापर केल्यामुळे लेखे अपारदर्शक बनण्याची शक्यता असल्यामुळे सुसुत्रीकरण, प्रमाणिकीकरण व नियोजनपूर्वक वाटपाच्या प्रक्रियेसाठी योग्य ते गौणशीर्ष प्रस्तावित केले गेले पाहिजे व ८०० या गौणशीर्षाचा वापर शक्य तेवढा टाळला पाहिजे, असे महालेखाकार कार्यालयाचे मत आहे. त्यानुसार अर्थसंकल्पीय अंदाजाद्वारे करण्यात येणारी तरतूद योग्य त्या लेखाशीर्षाखाली अर्थसंकल्पीत करण्याची दक्षता घेण्याबाबत शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक बीजीएम-२०१६/प्र. क्र.५२६/अर्थसंकल्प-२, दिनांक २ जानेवारी, २०१७ अन्वये सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना कळविण्यात आलेले आहे. तसेच यासंदर्भात पुन्हा शासन पत्र, वित्त विभाग, क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र. क्र.१०८/अर्थसंकल्प-२, दिनांक २६ ऑगस्ट, २०२२ अन्वये आवश्यक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(ब) योजनांतर्गत व योजनेतर खर्चाच्या एकत्रिकरणानंतर काही उपगटशीर्षामध्ये व्दिरुक्ती दिसून आल्याची बाबही निदर्शनास आणली आहे. तसेच आवश्यकता असेल तर नवीन उपगटशीर्ष घेण्याबाबत सूचविले आहे. त्यामुळे व्दिरुक्ती झालेले उपगटशीर्ष वगळण्याबाबत विभागांनी योग्य ती कार्यवाही करावी.

(क) अर्थसंकल्पात शक्यतो ठोक तरतूदी ठेवण्यात येवू नयेत.

(ड) भांडवली खर्चाचे चुकीचे वर्गीकरण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

८. **कार्यक्रमांवरील खर्चाच्या योजनांविषयक अंदाज (राज्य/केंद्र/इतर संस्था)** - मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्या सर्व राज्य योजनांचा आढावा घेऊन काही राज्य योजना चालू ठेवाव्यात किंवा कसे, याबाबत निर्णय घ्यावयाचा आहे व त्याप्रमाणे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात ज्या योजना बंद करावयाच्या आहेत त्या योजनांचे अर्थसंकल्पिय अंदाज "निरंक" असतील. ज्या राज्य योजना सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात चालू ठेवणे आवश्यक आहे त्याकरिता प्रशासकीय विभागांनी त्या योजनांबाबतची स्वतंत्र धारिका सन २०२४-२५ साठी सुधारित अंदाज व सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजासाठी आवश्यक तरतूद दर्शवून नियोजन विभागाला सादर करावी. सदर राज्य योजना (वैधानिक मंडळे सध्या आस्तित्वात नसल्याने त्यांचा उल्लेख टाळण्यात आलेला आहे) नक्षलग्रस्त भागाचा विकास, महिला व बालविकास तसेच तृतीय पंथियांचा विकास, मानव विकास निर्देशांक व शाश्वत विकास ध्येय यांच्याशी लक्ष्यित (Targeted) असल्यास त्याची तपासणी करुन त्याचा प्रस्तावात उल्लेख करण्यात यावा. त्याप्रमाणे नियोजन विभागाची मान्यता घेऊन प्रस्ताव छाननीसाठी वित्त विभागाकडे वित्त विभागाने विहित केलेल्या कालावधीत पाठवावेत. ज्या राज्य योजना सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये चालू ठेवावयाच्या नाहीत अशा योजनांबाबत वर नमूद केल्याप्रमाणे फक्त सन २०२४-२५ साठी सुधारित अंदाज नमूद करुन धारिका सादर करावी. प्रत्येक योजनेसाठी स्वतंत्र संगणक संकेतांक (CRC Code) असावा. तसेच, (i) केंद्र पुरस्कृत योजना (Centrally Sponsored Schemes), (ii) बाह्यसहाय्यित प्रकल्प(Externally Aided Projects) व (iii) अंतर्गत वित्तीय संस्था (Domestic Finance Institute) यांचेकरिता केंद्र व राज्य हिश्याकरिता वेगवेगळा संगणक संकेतांक (CRC Code) असावा. निधीची मागणी उद्दिष्टनिहाय (Object wise) करण्यात यावी.

८.१ याशिवाय नव्याने योजना सुरू करणे आवश्यक वाटत असल्यास, अशा योजनेबाबतचे स्वतंत्र प्राथमिक प्रस्ताव प्रशासकीय विभागाने नियोजन विभागाची सहमती मिळाल्यानंतर वित्त विभागाकडे पाठवावेत. नियोजन व वित्त विभागाची सहमती मिळाल्यानंतर सदर नवीन योजनेला सीआरसी कोड घेण्याची कार्यवाही करावी. वरील परिच्छेद- ६ मध्ये नमूद केलेल्या मुद्याप्रमाणे तपासणी करून कार्यवाही करावी.

८.२ जिल्हास्तरीय योजनांतर्गत (विद्यमान कार्यक्रमांतर्गत) सर्वसाधारण नियतव्यय २००८-२००९ पासून नियोजन विभागाखाली अर्थसंकल्पित होत असल्यामुळे त्याची तरतूद पुन्हा संबंधित प्रशासकीय विभागाच्या पुस्तकात होणार नाही याची विभागांनी दक्षता घ्यावी.

८.३ अनुसूचित जाती घटक कार्यक्रम (Scheduled Caste Component Schemes) व आदिवासी घटक कार्यक्रम (Tribal Component Schemes) याबाबतचे सन २०२४-२५ चे सुधारित अंदाज व सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता अर्थसंकल्पिय अंदाज अनुक्रमे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि आदिवासी विकास विभाग यांच्या मान्यतेने वित्त विभागाकडे थेट पाठवावेत.

८.४ मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी वार्षिक कार्यक्रम २०२५-२६ तयार करतांना नविन योजनांची परिपूर्ण माहिती तसेच जुन्या योजनांची माहिती MP-SIMS प्रणालीवर भरणे राहिले असल्यास, त्या

योजनांचीही परिपूर्ण माहिती MP-SIMS प्रणालीवर प्रथम भरावी. वार्षिक कार्यक्रम सन २०२५-२६ साठी सर्व केंद्र व राज्य योजनांचे Scheme Profile अद्ययावत करणे आवश्यक असून त्यामध्ये (i) योजनांची नावे, (ii) योजनांची संक्षिप्त माहिती, (iii) केंद्र पुरस्कृत योजना असल्यास त्या योजनेचा चार अंकी योजना संकेतांक व केंद्र शासनाच्या ज्या छत्र योजनेखाली (Umbrella Scheme) निधी प्राप्त झालेला आहे त्या छत्र योजनेचे नाव, (iv) केंद्र व राज्य योजनेचे लेखाशीर्ष, (v) संगणक संकेतांक(CRC), (vi) योजनेच्या प्रशासकीय मान्यतेबाबतचा शासन निर्णय (G.R.) अपलोड करणे इ. माहिती MP-SIMS मध्ये पूर्णपणे भरली असल्याची खातरजमा करण्यात यावी. चुकीचे CRC नोंद असल्यास किंवा डमी CRC हे MP-SIMS प्रणालीवर सुधारित करण्यात यावेत. यानंतर सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी निधीची मागणी नोंदविण्यात यावी. ही माहिती "Submit to Planning" या Tab द्वारे नियोजन विभागाला सादर करण्यात यावी. त्यानंतर त्याची छापील प्रत घेऊन प्रशासकीय विभागाच्या सचिवांच्या मान्यतेने परिच्छेद- ८ प्रमाणे कार्यवाही करुन नस्तीसोबत नियोजन विभागाकडे पाठविण्यात यावी.

८.५ नियोजन व वित्त विभागाने मान्य केलेल्या योजनांचा एकत्रित विभागनिहाय प्रस्ताव अर्थसंकल्पीय आकारमान व कार्यक्रम उपसमितीला मान्यतेसाठी सादर केला जाईल. अर्थसंकल्पीय आकारमान व कार्यक्रम उपसमितीने मान्यता दिलेल्या बदलासह वार्षिक कार्यक्रम विधानमंडळास सादर करण्यात येईल.

८.६ वरीलप्रमाणे मंजूर झालेल्या कार्यक्रमावरील खर्चाच्या निधीचे अंदाज, प्रशासकीय विभागांनी आपल्या विवरणपत्र "ए", "बी", "सी" मध्ये समाविष्ट करावेत. त्याचप्रमाणे कार्यक्रमांवरील खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाजाचा मेळ घालणे सुकर व्हावे यासाठी विवरणपत्र "डी" यातील गोषवारा निश्चितपणे पाठविण्यात यावा. ही विवरणपत्रे नियोजन विभागाच्या मान्यतेने वित्त विभागाकडे पाठविण्यात यावीत.

९. **केंद्र शासन व इतर संस्थांकडून प्राप्त होणारे सहाय्य आणि जागतिक बँक प्रकल्पांसाठी आवश्यक त्या तरतुदी यांचे अंदाज**. ---- केंद्र पुरस्कृत व केंद्रीय क्षेत्र योजनांसाठी केंद्राकडून वित्तीय सहाय्य प्राप्त होते. या सहाय्याचा पुरेपूर विनियोग व्हावा म्हणून या योजनांसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात याव्यात. या अनुषंगाने शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक बीजीटी. १०७६/३२५/बीयूडी-५, दिनांक २४ सप्टेंबर, १९७६ अन्वये "१६०१, केंद्र सरकारकडून सहायक अनुदाने", "६००३, राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण" आणि "६००४, केंद्र सरकारकडून कर्ज व आगाऊ रकमा" या प्रधान शीर्षाखालील तपशीलवार अंदाज पाठवावेत असेही प्रशासकीय विभागांना कळविण्यात आलेले आहे. तसेच जागतिक अन्न कार्यक्रम, "कासा", "केअर", इत्यादींसारख्या निरनिराळ्या एजन्सीकडून मदत म्हणून विनामूल्य मिळणाऱ्या सामग्रीच्या, साहित्याच्या बाबतीतील व्यवहाराची नोंद करण्याकरिता शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक एसीसी. १०८२/८४९/ बीयूडी-२, दिनांक २६ एप्रिल, १९८३ अन्वये विहित केलेल्या सुधारित लेखांकन पद्धतीकडे मंत्रालयीन प्रशासकीय विभागाचे लक्ष वेधण्यात येत आहे. ही पद्धत (अ) "१६०१, केंद्र सरकारकडून सहाय्यक अनुदाने, (ब) "३६०६, साह्यकारी साहित्य व साधनसामग्री" व (क) "६००४, केंद्र सरकारकडून कर्जे व आगाऊ रकमा" या प्रधानशीर्षाखाली सन २०२५-२०२६ चे अर्थसंकल्पीय अंदाज व सन २०२४-२०२५ चे सुधारित अंदाज सादर करताना अनुसरण्यात यावी. त्याचप्रमाणे जागतिक बँक आणि जागतिक अन्न कार्यक्रम, कासा, केअर, इत्यादीसारख्या निरनिराळ्या एजन्सीजच्या सहकार्याने हाती घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमांकरिता/प्रकल्पांकरिता पुरेसा निधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने योग्य व वक्तशीर उपाययोजना करण्यात यावी, अशी प्रशासकीय विभागांना विनंती करण्यात येत आहे.

**१०. शाश्वत विकास ध्येये (Sustainable Development Goals) यांची (i) राज्यस्तरीय योजना (State Level Schemes) व (ii) जिल्हास्तरीय योजना (District Level Schemes) यांचेशी सांगड (Mapping) घालणे व राज्य निर्देशक आराखडा (State Indicator Framework) करिता अचूक माहिती संकलित करणेबाबत-**

१०.१ - केंद्र शासनाच्या सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने (i) केंद्र पुरस्कृत योजना (Centrally Sponsored Schemes) व (ii) केंद्रीय क्षेत्र योजना (Central Sector Schemes) यांची १७ शाश्वत विकास ध्येये व १६९ लक्ष्ये यांचेशी सांगड घालण्याची कार्यवाही पूर्ण केली असून त्याबाबतची "राष्ट्रीय निर्देशक चौकट" (National Indicator Framework) देखील तयार केली आहे. त्याचप्रमाणे "राज्यस्तरीय योजना (State Level Schemes) व जिल्हास्तरीय योजना (District Level Schemes) यांची १७ शाश्वत विकास ध्येये व १६९ लक्ष्ये यांचेशी सांगड घालण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आलेली आहे व ती "MP-SIMS" मध्ये अंतर्भूत करण्यात आलेली आहे. राज्याचा "राज्य निर्देशक आराखडा" (State Indicator Framework) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय यांनी दिनांक ११ जुलै, २०२२ च्या अ.शा. पत्रासोबत उपलब्ध करुन दिला आहे. तसेच त्याची प्रत अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या mahades.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**११. नियोजन विभागाच्या MP-SIMS प्रणालीवर केंद्र पुरस्कृत योजना (Centrally Sponsored Schemes) यासाठी तयार केलेल्या Comprehensive Module मधील माहिती अद्ययावत करणेबाबत-**

केंद्र पुरस्कृत योजनांच्या निधीचे परिणामकारक व्यवस्थापन करण्याच्या तसेच निधी विनियोगाच्या प्रक्रियेत अधिक परिणामकारकता आणण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाने त्यांचे कार्यालयीन ज्ञापन क्र.१ (१३)/PFMS/FCD, दिनांक २३ मार्च, २०२१ अन्वये दिनांक १ जुलै, २०२१ पासून सुधारित कार्यपध्दतीचा अवलंब करण्याचे निर्देश दिलेले आहेत. सुधारित कार्यपध्दतीनुसार प्रत्येक केंद्र पुरस्कृत योजनेच्या अंमलबजावणीसाठी संबंधित प्रशासकीय विभागाने एका "Single Nodal Agency (SNA)" ची नेमणूक करुन त्या योजनेसाठी प्राधिकृत बँकेमध्ये स्वतंत्र "Single Nodal Bank Account" उघडणे व योजनेच्या समन्वयाच्या दृष्टीने किमान उप सचिव दर्जाच्या अधिकाऱ्याची "Nodal Officer" म्हणून नियुक्ती करणे,याप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे. यासंदर्भात वित्त विभागाच्या परिपत्रक क्र.संकीर्ण १०१८/प्र.क्र. ४६/अर्थोपाय, दिनांक ५ डिसेंबर, २०२३ अन्वये दिलेल्या सूचनांनुसार केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत केंद्र हिस्सा वितरित झाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत केंद्र हिश्श्याचा निधी व समतोल राज्य हिश्श्याचा निधी "Single Nodal Agency" च्या अकाऊंटमध्ये जमा करावयाचा आहे. त्यामुळे केंद्र हिश्श्याच्या प्रमाणात आवश्यक असलेला राज्य हिश्श्याचा अर्थसंकल्पीय नियतव्यय उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. तसेच याकरीता नियोजन विभागाच्या योजना माहिती प्रणालीवरील योजनांचे "Scheme Profile" अद्ययावत करण्यात यावेत. तसेच, प्रशासकीय विभागांनी केंद्र पुरस्कृत योजनेची सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या ३ वर्षांकरिता केंद्र शासनाकडून प्रत्यक्ष प्राप्त झालेल्या केंद्र हिश्श्याबाबत अचूक माहिती नियोजन विभागाच्या योजना माहिती प्रणालीवर तयार केलेल्या "Central Fund Distribution" मध्ये भरण्याची कार्यवाही प्राथम्याने पूर्ण करावी.

**१२. "लिंग भाव अर्थसंकल्प" (Gender Budget) व "बाल अर्थसंकल्प" (Child Budget)-**

१२.१ महिला, बालक व तृतीयपंथी व्यक्ती हे समाजातील सर्वात कमकुवत गटांपैकी एक आहेत. महिलांचे सक्षमीकरण करणे व बालकांच्या विकासाकरीता त्यांच्या गरजांचा समावेश शासकीय धोरणे, उपक्रम आणि सहभाग यामध्ये होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी महिला, बालक व तृतीयपंथी व्यक्ती यांच्या गरजांचे प्राधान्यक्रम ठरविणे ही लिंग आधारित आणि बालक अर्थसंकल्पाची मध्यवर्ती कल्पना आहे.

१२.१.१. वित्त विभागाकडून (फलनिष्पती अर्थसंकल्प कार्यासन) लिंग आधारीत अर्थसंकल्प व बाल अर्थसंकल्प विवरणपत्र सन २०२५-२६ प्रकाशित करण्यात येणार आहे.

"लिंग भाव अर्थसंकल्प" (Gender Budget) व "बाल अर्थसंकल्प" (Child Budget) विवरणपत्राची सन २०२५-२६ करिता विभागणी खालीलप्रमाणे राहील :-

१) महिला व मुली / बालके / तृतीयपंथी यांच्यासाठी १०० टक्के प्रत्यक्ष खर्च.

२) महिला व मुली / बालके / तृतीयपंथी यांच्यासाठी १०० टक्केपेक्षा कमी प्रत्यक्ष खर्च.

यानुषंगाने सन २०२५-२६ अपेक्षित खर्चासह २०२४-२५ व २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरिता माहिती भरावयाची आहे. त्याकरीता संबंधित प्रशासकीय विभागाने वित्त विभाग, फलनिष्पती अर्थसंकल्प शाखेस त्यांनी विहित केलेल्या प्रपत्रात आवश्यक माहिती जानेवारी, २०२५ पर्यंत उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात यावी.

**१३. कार्यक्रम अंदाजपत्रके**

१३.१ अर्थसंकल्प विधानमंडळास सादर झाल्यानंतर त्याच दिवशी अथवा दुसऱ्या दिवशी विधानमंडळाला कार्यक्रम अंदाजपत्रके उपलब्ध करुन देणे अनिवार्य असल्याने "कार्यक्रम अंदाजपत्रक" ही प्रकाशने, सन २०२५-२६ चा अर्थसंकल्प विधानमंडळास सादर झाल्यानंतर त्याच दिवशी अथवा दुसऱ्या दिवशी विधानमंडळास सादर करण्यात यावीत. प्रशासकीय विभागांनी, वरील परिच्छेद- ४ मध्ये विहित केलेल्या अर्थसंकल्पीय वेळापत्रकानुसार काटेकोरपणे कामकाज केले नाही तर, त्यांना आपली कार्यक्रम अंदाजपत्रके विधानमंडळाला वेळेवर सादर करता येणे शक्य होणार नाही.

१३.२ (एक) "कार्याची रुपरेषा" व (दोन) "पदे, वेतनमान यांचे विवरणपत्र" ही प्रकाशने मुख्य अर्थसंकल्पीय प्रकाशनांसोबत विधानमंडळाच्या सदस्यांना देण्यात येत होती. ही प्रकाशने १९८१-१९८२ या वर्षापासून बंद करण्यात आली. परंतु या दोन प्रकाशनांमधील माहिती त्या त्या विभागाच्या कार्यक्रम अंदाजपत्रक या प्रकाशनामध्ये योग्य रितीने निदर्शनास आणून देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. यासंबंधातील आवश्यक त्या सूचना शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक पीएफबी.१०८१/सीआर-८/८१/बीयूडी-१७, दिनांक ३ फेब्रुवारी, १९८१ अन्वये देण्यात आल्या आहेत.

**१४.** अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२५-२०२६ आणि सुधारित अंदाज २०२४-२०२५ ची माहिती प्रचलित पध्दतीने परिच्छेद- ४ मध्ये नमूद केलेल्या तारखा विचारात घेऊन विहित कालमर्यादेत पाठविण्यात यावी. तसेच वित्त विभागाकडे सदर अंदाज सॉफ्ट कॉपी स्वरुपात पाठविण्याची बिम्सवर नवीन प्रणाली विकसित केलेली आहे. सदर प्रणालीवर ऑनलाईन पध्दतीने याबाबतची माहिती विहित कालमर्यादेत न चुकता वित्त विभागास सादर करणे अनिवार्य आहे. उपरोक्त प्रणालीवर विभागस्तरावर मान्य केलेली माहिती भरण्याची व भरलेल्या माहितीची प्रिंट काढून ती वित्त विभागास सादर करण्याची कार्यपध्दती सोबतच्या **प्रपत्रामध्ये** देण्यात आलेली आहे.

**१५.** हे परिपत्रक, नियोजन विभागाशी विचारविनिमय करून निर्गमित करण्यात येत आहे.

**१६.** सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२४१००७१६१६२९८१०५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PANDURANG JOTIBA JADHAV

Digitally signed by PANDURANG JOTIBA JADHAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT,
2.5.4.20=476d37b83707d4fa8d081fe85145aa8df78154c98a1889573cd2900918d397e5, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=A256E2285AACFD4CDF1A5A468970133F213ECC0C01D84AA031BA50479F2EEF89, cn=PANDURANG JOTIBA JADHAV
Date: 2024.10.07 16:05:41 +05'30'

**( पां. जो. जाधव )**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
२) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर.
३) महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
४) महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
५) सर्व मंत्रालयीन विभाग.
६) *सचिव, राज्यपालांचे कार्यालय, मुंबई.
७) *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
८) *प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई.
९) *प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई.
१०) मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख.
११) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
१२) वित्त विभागातील सर्व कार्यासन अधिकारी.

---------

*पत्राद्वारे
यांच्या माहितीकरिता आणि मार्गदर्शनासाठी प्रत अग्रेषित.

## जोडपत्र-१
## दोन अंकी प्रमाण उद्दिष्ट शीर्षाची सूची

| उद्दिष्ट क्र. | उद्दिष्ट | उद्दिष्ट क्र. | उद्दिष्ट |
|---|---|---|---|
| ०१ | वेतन | ३१ | सहायक अनुदाने (वेतनेतर) |
| ०२ | मजुरी | ३२ | अंशदाने |
| ०३ | अतिकालिक भत्ता | ३३ | अर्थसहाय्य |
| ०४ | निवृत्तिवेतनविषयक खर्च | ३४ | शिष्यवृत्त्या/विद्यावेतने |
| ०५ | बक्षिसे | ३५ | भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता अनुदान |
| ०६ | दूरध्वनी, वीज व पाणी शुल्क | ३६ | सहायक अनुदाने (वेतन) |
| १० | कंत्राटी सेवा | ४१ | गुप्तसेवा खर्च |
| ११ | देशांतर्गत प्रवास खर्च | ४२ | ठोक तरतूद |
| १२ | विदेश प्रवास खर्च | ४३ | निलंबन |
| १३ | कार्यालयीन खर्च | ४४ | विनिमय तफावत |
| १४ | भाडेपट्टी व कर | ४५ | व्याज |
| १५ | स्वामित्व धन | ४६ | साधनसंपत्तीचे केंद्र/राज्य हस्तांतरण |
| १६ | प्रकाशने | ५० | इतर खर्च |
| १७ | संगणक खर्च | ५१ | मोटार वाहने |
| १८ | सुट्टीच्या दिवसाची भरपाई | ५२ | यंत्रसामग्री व साधनसामग्री |
| १९ | आहार खर्च | ५३ | मोठी बांधकामे |
| २० | इतर प्रशासकीय खर्च | ५४ | गुंतवणुका |
| २१ | पुरवठा व सामग्री | ५५ | कर्जे व आगाऊ रकमा |
| २२ | शस्त्रे व दारूगोळा | ५६ | कर्जाची परतफेड |
| २३ | शिधावाटप खर्च | ५७ | पशुधन |
| २४ | पेट्रोल, तेल व वंगण | ६० | इतर भांडवली खर्च |
| २५ | पोशाख, राहुटी व भांडारे | ६१ | घसारा |
| २६ | जाहिरात व प्रसिद्धी | ६२ | राखीव |
| २७ | लहान बांधकामे | ६३ | आंतरलेखा हस्तांतरणे |
| २८ | व्यावसायिक सेवा | ६४ | हानी निर्लेखित करणे |
| २९ | वस्तूच्या विक्रीसाठी खरेदी (दूध इत्यादी) | ७० | वजा-वसुली. |
| ३० | इतर कंत्राटी सेवा | ७२ | यंत्रसामग्री व उपकरणे यांची देखभाल व दुरुस्ती |

-------- ------

# प्रपत्र

सर्व संबंधित प्रशासकीय विभागाच्या अर्थसंकल्प शाखांनी BEAMS प्रणालीच्या LIVE MODE वर अर्थसंकल्पीय अंदाज (अनिवार्य) व सुधारीत अंदाज (अनिवार्य व कार्यक्रम) तसेच जमा रकमा यांचे अर्थसंकल्पीय अंदाज व सुधारीत अंदाज यांची माहिती नोंदविणे आवश्यक आहे. त्यासाठी संबंधित विभागाच्या अर्थसंकल्प शाखांनी प्रथमत: BEAMS प्रणालीच्या LIVE MODE वरील DRAFT MODE मध्ये ESTIMATE वर नमूद खर्चाचे / जमेचे अर्थसंकल्पीय / सुधारीत अंदाजांचा मजकूर अचूक नोंदवावा. सदर माहिती तपासून व ती APPROVE करुन FINAL MODE ला पाठवावी. तद्नंतर सुधारणा असल्यास आवश्यक त्या सुधारणेसह FINAL MODE ला APPROVE करुन ती वित्त विभागाच्या अर्थसंकल्प शाखेतील संबंधित कार्यासनाकडे FORWARD करावी. तत्पूर्वी याबाबतच्या माहितीची प्रत काढावी व सदर माहिती ज्या प्रचलित पध्दतीने विभागाच्या मान्यतेसह प्रस्ताव पाठवितात त्या प्रस्तावासोबत वित्त विभागाच्या अर्थसंकल्प शाखेतील संबंधित कार्यासनाकडे विहित मुदतीत पाठविणे आवश्यक आहे. ही माहिती अचूक लेखाशिर्षामध्ये उद्दिष्टनिहाय भरणे आवश्यक आहे. नमुन्यादाखल माहितीचा मसुदा खालीलप्रमाणे आहे.







२. या कार्यवाहीमध्ये काही तांत्रिक अडचण उद्भवल्यास संबंधित प्रशासकीय विभागांनी तातडीने वित्त विभागाच्या अर्थसंकल्प शाखेतील संबंधित कार्यासनाकडे किंवा अर्थ-४ या कार्यासनाकडे तात्काळ संपर्क साधावा.

** *** *** *** **